# मेट्रो ३ : शेवटचा बोगदा पूर्ण होणार

**मुंबई** : कुलाबा-वांद्रे-सिप्झ या तिसऱ्या भुयारी मेट्रो मार्गिकेच्या शेवटच्या बोगद्याचे काम आठवडाभरात पूर्ण होणार असून टनेल बोअरिंग मशीनच्या माध्यमातून ४२ वा बोगदा पूर्ण होणार आहे.

कुलाबा-वांद्रे-सिप्झ या तिसऱ्या भुयारी मार्गाचे संचालन मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या माध्यमातून करण्यात येत आहे. प्रकल्प संचालक सुबोध के. गुप्ता यांनी दिलेल्या माहितीनुसार विज्ञान संग्रहालयाजवळील भुयारी मार्गाने तानसा १ हे टनेल बोअरिंग मशीन सप्टेंबर २०२० मध्ये दाखल करण्यात आले होते. जानेवारी २०२२ रोजी महालक्ष्मीपर्यंत पोहोचण्यासाठी ११३६ मीटर अंतर टीबीएमच्या माध्यमातून कापण्यात आले. महालक्ष्मी ते मुंबई सेंट्रल दरम्यान बोगदा खणण्यासाठी एप्रिल २०२२ मध्ये टीबीएम पुन्हा दाखल करण्यात आले. येत्या आठवडाभरात मुंबई सेंट्रल येथे टीबीएम पोहोचणार असून बोगद्याचे काम ९९.७ टक्के पूर्ण झाले आहे. केवळ १५ ते २० सेगमेंट रिंग्ज बसवण्याचे काम शिल्लक असल्याने ते लवकरच पूर्ण करण्यात येणार आहे.